# मुंबईतील तरुणाईची गावकऱ्यांना मदत

मुंबई, सोमवार - जोरात बरसणाऱ्या पावसामुळे अवघ्या तरुणाईला वेध लागलेत ते ट्रेकिंग अथवा धबधब्यात चिंब भिजण्याचे. मात्र त्याच वेळी दुसऱ्या बाजूला काही तरुण मंडळी मात्र आजही 'लोडशेडिंग'शी झुंजणाऱ्याच खेडेगावांना भेट देऊन त्यांच्या समस्या दूर करण्यावर भर देत आहेत. विलेपार्ले येथील 'द ग्रीन इंडिया इनिशिएटिव्ह' या स्वयंसेवी संस्थेचे तरुण कार्यकर्ते सध्या याच समाजकार्यात व्यस्त आहेत.

नुकतेच या संस्थेने रोटरॅक्ट क्लब ऑफ जय हिंद कॉलेजच्या मदतीने कल्याण येथील शिवाजीनगर, विरार येथील बारामपूर आणि नाशिक येथील तपोवन गावातील

